Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X | ISSUE- III | MARCH | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांच्या योगदानाचा अभ्यास

**डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते**
सहायक प्राध्यापक,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
ईमेल – shashikantannadate83@gmail.com

## प्रस्तावना

संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. यशवंतराव चव्हाण कॉंग्रेसचे महत्वाचे नेते होते, त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर शिक्षण, सहकार, साहित्य, कृषी व सांस्कृतिक क्षेत्रात राज्याचा सर्वांगीण विकासाला गती दिली. सर्वसामान्य लोक, शेतकरी यांच्यासाठी अखेरपर्यंत कार्य करत राहीले. महाराष्ट्रात सुसंस्कृत राजकारण करण्याची परंपरा त्यांनी रुजवली. राज्यात व केंद्र शासनात त्यांनी अनेक मोठी पदे भूषवली पण नेतेपणाचा, नेतृत्वाचा आव त्यांनी कधी आणला नाही, सामान्य माणसांचे, गोरगरीबांचे जीवन सुसंपन्न कसे होईल याचा सदोदित विचार करून त्यांनी आपले राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्य केले असल्याचे दिसते. त्यामुळे एस. एम. जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे, यशवंतराव चव्हाण म्हणजे 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' होय.

## कौटुंबिक संस्कार व शिक्षण

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे, ता. खानापूर, जि. सांगली येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव यशवंतराव बळवंतराव चव्हाण होते. ते केवळ चार वर्षांचे असतांना त्यांचे वडील प्लेगच्या साथीत मृत्यू पावले. त्यानंतर त्यांचे सर्व शिक्षण आई व मोठ्या भावाने पूर्ण केले. यशवंतरावांच्या आई विठाबाई निरक्षर होत्या पण त्यांनी आपल्या मुलावर केलेले संस्कार खूप मोलाचे होते, असे यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात लिहिले आहे.

यशवंतराव चव्हाण यांचा बालपणापासूनच देशाच्या स्वातंत्र्य चळवळीकडे ओढा होता. कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत असतांना त्यांनी असहकार चळवळीत सहभाग घेतला होता, त्यात तिरंगा फडकवला म्हणून त्यांना अठरा महिन्यांची कैदेची शिक्षाही झाली होती. इतिहास व राज्यशास्त्र विषयात १९३८ मध्ये ते बी.ए. झाले, त्यानंतर त्यांचा कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांशी संबंध येऊ लागला. १९४१ मध्ये ते एल.एल.बी. पास झाले. १९४२ मध्ये फलटणच्या वेणूताईंशी त्यांचा विवाह झाला. त्यांची पत्नी म्हणून लाभलेली प्रेमळ साथ अनेक वेळा मार्गदर्शक ठरल्याचे ते 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात लिहितात.

यशवंतराव चव्हाण यांनी १९५७ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री, १९६० ते १९६२ मध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, १९६२ ते १९६६ मध्ये भारताचे संरक्षणमंत्री त्यानंतर अर्थमंत्री, गृहमंत्री व उपपंतप्रधान अशी विविध पदे भूषवली. आपल्या शासनातील विविध पदांचा उपयोग त्यांनी महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी केला.

## शिक्षण क्षेत्रातील क्रांतीकारक निर्णय व कार्य

शिक्षण हि दीर्घकालीन गुंतवणूक आहे. त्यातून उद्याचा महाराष्ट्र निर्माण होणार आहे. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्य करण्याचे यशवंतराव चव्हाण यांनी ठरवले. यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री होताच वार्षिक ९०० रुपये वा त्याहून कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण मोफत देण्याची योजना त्यांनी मंत्रीमंडळात मांडली होती. त्यावेळी अर्थमंत्री असणाऱ्या जीवराज मेहता यांनी मोफत शिक्षणाच्या योजनेस विरोध केला तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी 'मी गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देऊ शकत नसेल तर मुख्यमंत्री पदावर मला राहण्याचा अधिकार नाही.' असे म्हणून मंत्रिमंडळ बैठकीतून सभात्याग केला होता. त्यानंतर मोफत शिक्षणाची योजना मंत्रिमंडळात चर्चा करून मंजूर

झाली होती. या योजनेमुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रचार-प्रसार घडून येण्यास मदत झाली होती.

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असतांना त्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाला गती दिली. गाव तेथे प्राथमिक शाळा, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे आणि शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण या बाबींवर भर देण्यात आला होता. या काळात खाजगी संस्थाना माध्यमिक शाळा उघडण्याची परवानगी देऊन त्यांना सरकारी अनुदान देण्याचे उदार धोरण स्वीकारण्यात आले. ७ मार्च १९६० रोजी पुणे येथे स्वतंत्र एस.एस.सी बोर्डची स्थापना करण्यात आली.

या काळात महाराष्ट्रात कराड, नागपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करून तांत्रिक व्यावसायिक शिक्षणाची संधी गोरगरीबांसाठी उपलब्ध करून दिली. याच कालावधीतचा त्यांनी शेतकी विद्यालये व विद्यापीठे महाराष्ट्रात स्थापन केली.

**कृषी औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ**

यशवंतराव चव्हाण यांना कृषी औद्योगिक समाजरचना अपेक्षित होती, त्यासाठी त्यांनी कृषी औद्योगिक संस्था स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. महाराष्ट्रात शेतीवर आधारित असणारे सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्यांची स्थापना करण्यास सुरवात केली. त्यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत १५ औद्योगिक वसाहती स्थापन केल्या. सरकारबरोबर नगरपालिका, महानगरपालिका, सहकारी संस्था आणि खाजगी उद्योग संस्था यांना औद्योगिक वसाहती स्थापन करण्यास मुंबई राज्य सरकारने अनुमती देणारे नियम तयार करण्यात आले. एम.आय.डी.सी संस्थेची स्थापना करून ग्रामीण भागातील लोकांना शहरी भागात रोजगार उपलब्ध करून देण्यात आले. एम.आय.डी.सी मुळे जिल्हा व तालुका पातळीवर औद्योगिक वसाहती निर्मितीला चालना मिळाली.

यशवंतराव चव्हाण यांनी 'कसेल त्याची जमीन' हे तत्व लागू केले. त्यासाठी कुळ कायदा तयार करण्यात आला. शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा सिलिंग कायदा करून महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने पुरोगामी राज्य असल्याचे त्यांनी दाखवून दिले. शेतकऱ्यांना जमिनीचा मालकी हक्क मिळाल्याने जमीन सुधारणेला चालना मिळाली. विहीर, बागायती शेती करता येऊ लागल्याने शेतीमालाचे भरपूर उत्पादन होऊ लागले.

शेतकरी व ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी त्यांनी सहकार व पंचायत व्यवस्थेला पूरक असे निर्णय घेतले. त्यांच्या धोरणामुळे सहकारी साखर कारखाने, तेल गाळणे, फळ प्रक्रिया, सहकारी खरेदी-विक्री संघ असे सहकारावर आधारित उद्योग उभे राहिले. सहकाराच्या माध्यमातून शेतकरी वर्ग लहान मोठे उद्योग करू लागल्याने त्यांची आर्थिक भरभराट होऊ लागली. लोकांना रोजगार मिळाला. त्यांच्या काळात १८ सहकारी साखर कारखान्यांची नोंद होऊन सहकारात एक नवीन विक्रम स्थापित झाला. यशवंतराव चव्हाण यांनी १ मे १९६२ रोजी पंचायतराज व्यवस्थेची सुरवात करून ग्राम स्तरावरील सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकशाहीला बळकटी आणली.

**महाराष्ट्र संस्कृतीची जोपासना व साहित्य संस्थाना मदत**

यशवंतराव चव्हाण यांना साहित्याची आवड होती. त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या तीन खंडाची नावे अनुक्रमे कृष्णाकाठ, सागरतीर व नर्मदा अशी ठरवली होती. पण यातील फक्त कृष्णाकाठ हा पहिला खंड पूर्ण झाला. त्यांनंतर त्यांची संरक्षण मंत्री म्हणून नेमणूक झाली तेव्हा 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला' अशी म्हण रूढ झाली. त्यांनी साहित्य महामंडळ सारख्या अनेक साहित्य संस्थाना मदत केली तसेच मराठी साहित्य संमेलनासही मदत केली.

यशवंतरावांनी नाट्य, संगीत, नृत्य व तमाशा इत्यादी अनेक कलागुणांना विकसित करण्याचे धोरण स्वीकारले. नाटकांच्या पुस्तकांना बक्षिसे सुरु केली. नाट्यक्षेत्रातील हौशी कलाकारांना प्रोत्साहन मिळावे म्हणून नाट्य महोत्सव भरवण्यास सुरवात केली. संगीत, नृत्य व नाट्य यांचे शिक्षण देणाऱ्या संस्थाना अनुदाने देण्याचे धोरण स्वीकारले. मराठी विश्वकोशाची निर्मिती करण्यासाठी वाई येथे संस्थेचे स्थापना करून त्याच्या अध्यक्षपदी अभ्यासू व संशोधक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नेमणूक केली, त्यांनी अपार मेहनतीमधून आणि विद्वत्तेमधून निर्माण झालेले विश्वकोश खंड हे महाराष्ट्राचा सांकृतिक ठेवा आहेत. २४ मे १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना करून साहित्यिकांना साहित्य निर्मितीची प्रेरणा मिळावी म्हणून पुरस्कार सुरु केले तसेच नवसाहित्यिकांना त्यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी मदत केली.

**समारोप**

अशा प्रकारे सर्वसामान्य लोक, ग्रामीण भागातील जनता डोळ्यांसमोर ठेवून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीचे अनेक निर्णय घेतले. शिक्षण, शेती, सहकार, साहित्य व संस्कृती इत्यादी क्षेत्रात यशवंतराव चव्हाण यांनी आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. त्यातून एक स्थिर, पुरोगामी राज्य अशी अखंड भारतात महाराष्ट्राची प्रतिमा निर्माण होण्यास मदत झाली.

**संदर्भग्रंथ**

१. चव्हाण, यशवंतराव. (१९९२). सह्याद्रीचे वारे, मुंबई : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान
२. क्षीरसागर, व्ही.एस (२०२२). महाराष्ट्रातील समाजसुधारक व व्यक्तीविशेष, पुणे, के' सागर पब्लिकेशन्स
३. कठारे, अनिल (२०१९). आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, नांदेड, निर्मल प्रकाशन
४. शिंदे, पी.एन. (२०२०). आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कोल्हापूर, फडके प्रकाशन